# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत प्रासंगिक करार बस सुविधा माफक दरात

➢ **शनिवार व रविवार या दिवशी दरामध्ये २५% सवलत**

पुणे व पिंपरी चिंचवड शहर हे सांस्कृतिक, शैक्षणिक, आयटी हब व औद्योगिक शहर म्हणून नावारूपास आलेले आहे. दोन्ही शहरांत विद्यार्थी, नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात असून परराज्यातून अनेक भाविक, पर्यटक भेट देत असतात. पुणे महानगर परिवहन महामंडळ ही सार्वजनिक प्रवासी वाहतूक संस्था असून बस संचलन कार्यक्षेत्रापर्यंत प्रवासी नागरीक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालये व खाजगी कंपनी यांचे मागणीनुसार वैयक्तिक व सार्वजनिक कार्यक्रम, लग्न समारंभ, सहल व इतर कार्यक्रमांकरीता माफक दरामध्ये प्रासंगिक कराराने बससुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. परिवहन महामंडळामार्फत सदरील बस सुविधेसाठी प्रदूषण विरहीत असलेल्या वातानुकुलित ई-बस, सीएनजी बस संचनलाकरीता देण्यात आलेल्या आहेत जेणेकरून प्रवासी नागरीकांचा प्रवास आरामदायी, सुरक्षित व सुखकर व्हावा.

परिवहन महामंडळाच्या प्रवासी संख्येत वाढ होणेच्या दृष्टीने शनिवार व रविवार या दिवशी साप्ताहिक सुट्टी असल्याने त्यांना जर्नी प्लॅन करण्याकरीता परिवहन महामंडळाकडून दरामध्ये २५% सवलत देण्यात आलेली आहे. तसेच दोन्ही शहरातील प्रदूषण कमी होणेच्या दृष्टीने व वाहतूक कोंडीच्या समस्येतून मुक्त होणेकामी सार्वजनिक बस वाहतूक संस्थेचा जास्तीत जास्त प्रवासी नागरीकांनी वापर करावा असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

### प्रासंगिक करार बस सुविधा माफक दर तक्ता

| अ.क्र. | तपशील | सीएनजी बसचे दर (रूपयांत) | ई-बसचे दर (रूपयांत) |
|---|---|---|---|
| | **सोमवार ते शुक्रवार करीता** | | |
| १ | ८ तासांकरीता जीएसटी सह दर<br>(सकाळी ०६.०० ते दुपारी ०२.०० व दुपारी ०२.०० ते रात्रौ १०.०० पर्यंत) | ८,४६९/- | ९,९५१/- |
| २ | १६ तासांकरीता जीएसटी सह दर<br>(सकाळी ०६.०० ते रात्रौ १०.०० पर्यंत) | १६,९४०/- | १९,९०३/- |
| ३ | प्रस्तावित दराच्या ५० टक्के याप्रमाणे सोडणे अथवा आणणे (एकेरी खेप) जीएसटी सह दर<br>**सदरचा दर हा फक्त ५० कि.मी. पर्यंतच राहील.** | ४,२३४/- | ४,९७५/- |
| | **२५% सवलती नुसार शनिवार व रविवार करीता** | | |
| १ | ८ तासांकरीता जीएसटी सह दर<br>(सकाळी ०६.०० ते दुपारी ०२.०० व दुपारी ०२.०० ते रात्रौ १०.०० पर्यंत) | ६,३५२/- | ७,४३६/- |
| २ | १६ तासांकरीता जीएसटी सह दर<br>(सकाळी ०६.०० ते रात्रौ १०.०० पर्यंत) | १२,७०५/- | १४,९२७/- |
| ३ | प्रस्तावित दराच्या ५० टक्के याप्रमाणे सोडणे अथवा आणणे (एकेरी खेप) जीएसटी सह दर<br>**सदरचा दर हा फक्त ५० कि.मी. पर्यंतच राहील.** | ३,१७६/- | ३,७३१/- |

**sd/-**

**चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

दि. १०/१०/२०२३

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd/-**

कामगार व जनता संपर्क अधिकारी

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---